मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या संकेतस्थळाचे लोकार्पण

## आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते लोकार्पण : स्मार्ट शहरासाठी आधुनिक संकेतस्थळाची लोकाभिमुख सुरुवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका नागरिकांना डिजिटल माध्यमातून अधिक पारदर्शक, सक्षम व गतिमान सेवा पुरवण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. या पार्श्वभूमीवर, नव्याने विकसित करण्यात आलेल्या महापालिकेच्या संकेतस्थळाचे लोकार्पण आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. हे संकेतस्थळ आता सर्व नागरिकांसाठी अधिकृतपणे खुले करण्यात आले आहे.

नवीन संकेतस्थळाची प्रमुख वैशिष्ट्ये...

• ॲक्सेसिबिलिटी स्टँडर्ड:

दिव्यांग नागरिकांसाठी सुलभ असलेले संकेतस्थळ, डब्ल्यूसीएजी च्या डबल-ए (AA) मानांकनासह सुसज्ज आहे.

• कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित सर्च:

चॅट जीपीटीचा वापर करून माहिती अधिक सुलभपणे उपलब्ध होणार असून नागरिकांचे प्रश्न अधिक वेगात आणि अचूकतेने हाताळण्यासाठी यामुळे मदत होणार आहे.



• प्रणालीमध्ये सुरक्षितता आणि अभिप्राय नोंद प्रक्रियेत सुधारणा:

हॅकथॉन २०२५ अंतर्गत मिळालेल्या देशभरातील १७५ तज्ज्ञ सहभागींच्या अभिप्रायानुसार संकेतस्थळात सुधारणा करण्यात आल्या असून एथिकल हॅकर्समार्फत सखोल सुरक्षा तपासणी करण्यात आली आहे.

• शासन नियमांचे पालन:

केंद्र शासनाच्या GIGW मार्गदर्शक तत्त्वांनुसार संकेतस्थळाचे डिझाईन करण्यात आले आहे.

• संपूर्ण डिजिटल सेवा एकाच ठिकाणी:

करसंकलन, देयके भरणे, तक्रारी नोंदवणे यांसारख्या सेवा आता एका क्लिकवर उपलब्ध होणार आहेत.

या प्रकल्पासाठी महापालिकेचे मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण आणि श्रीमती उज्वला गोडसे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

> “महापालिकेचे नवे संकेतस्थळ हे नागरिक केंद्रित दृष्टिकोनातून तयार करण्यात आले असून, त्याचा उद्देश शहरवासीयांना डिजिटल माध्यमातून जलद, पारदर्शक आणि सुरक्षित सेवा देणे हा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ॲक्सेसिबिलिटी स्टँडर्ड्स आणि सुरक्षेच्या आधुनिक निकषांचा समावेश करून हे संकेतस्थळ अधिक सुलभ आणि विश्वासार्ह बनविण्यात आले आहे. हॅकेथॉन २०२५मधून मिळालेल्या तज्ज्ञांच्या अभिप्रायावर आधारित सुधारणा आणि एथिकल हॅकर्समार्फत सुरक्षा चाचणी यामुळे संकेतस्थळाची गुणवत्ता अधिक बळकट झाली आहे.
> - शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

> “पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या नव्या संकेतस्थळाचा विकास करताना केवळ तांत्रिक बाबींवर लक्ष केंद्रीत न करता, नागरिकांचा अनुभव केंद्रस्थानी ठेवण्यात आला आहे. हे संकेतस्थळ केवळ माहिती पुरवणारे माध्यम नसून, महापालिकेच्या विविध सेवा एका ठिकाणी उपलब्ध करून देणारा प्रभावी डिजिटल प्लॅटफॉर्म आहे. संकेतस्थळाच्या डिझाईनमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून माहिती शोधण्याची प्रक्रिया अधिक वेगवान आणि संवादात्मक केली आहे. दिव्यांग नागरिकांसाठी सुलभ ॲक्सेसिबिलिटी फीचर्स आणि सुरक्षेच्या आंतरराष्ट्रीय निकषांची पूर्तता करत संकेतस्थळ अधिक समावेशक आणि सुरक्षित बनविण्यात आले आहे.
> - निळकंठ पोमण, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, माहिती व तंत्रज्ञान विभाग.

# पिंपरी-चिंचवडमधील “मिसिंग लिंक” साठी लवकरच ‘ॲक्शन प्लॅन’

## विविध रस्त्यांच्या भूसंपादनाच्या कामाला गती द्या! : आमदार महेश लांडगे यांची जिल्हाधिकाऱ्यांना मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरासह समाविष्ट गावांमध्ये विकास आराखड्यातील रस्त्यांना भूसंपादनाचा मोठा अडथळा आहे. (MAHESH LANDGE) त्यामुळे तब्बल 42 ठिकाणी “मिसिंग लिंक” आहेत. संबंधित रस्त्यांचे काम पूर्ण करण्यासाठी ‘कृती आराखडा’ तयार करावा, अशी मागणी भाजपा नेते आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.



याबाबत जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना पत्र दिले आहे. त्यामध्ये म्हटले आहे की, पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने विकास होत आहे. ‘मेट्रो सिटी’ अशी ओळख असलेल्या या शहरामध्ये 2014 नंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका हद्दीतील पिंपरी-चिंचवडसह समाविष्ट गावांच्या विकासाला चालना देण्यात आली.

परिणामी, गेल्या १० वर्षांमध्ये शहर आणि उपनगरांमध्ये नागरीकरण आणि गृहप्रकल्प मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यामुळे वाहतूक कोंडी आणि ताण मोठ्या प्रमाणात वाढला आहे. महापालिका हद्दीतील एकूण 42 “मिसिंग लिंक” आहेत. त्याचे काम पूर्ण झाल्यास शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न सुटण्यास मोठी मदत होणार आहे. वाढत्या शहरीकरणाला पोषक पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करता येणार आहेत, असेही आमदार लांडगे म्हटले आहे.

### महापालिकेचे ‘मिसिंग लिंक’च्या कामाला प्राधान्य...

» शहरातील विविध भागांमध्ये सकाळच्या आणि संध्याकाळच्या वेळी वाहतूक कोंडी पाहायला मिळते. वेगाने वाढणारी लोकसंख्या आणि वाहनांची संख्या यामुळे रस्ते आणि पूल अपुरे पडत आहेत. ज्यामुळे रहदारीची कोंडी वाढली आहे. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने वाढत्या वाहतूक समस्येचे निराकरण करण्यासाठी एक व्यापक कृती आराखडा हाती घेतला आहे. त्याद्वारे मिसिंग लिंकचे काम प्राधान्याचे पूर्ण करण्याबाबत पाठपुरावा केला जात आहे. मात्र, भूसंपादनाअभावी मिसिंग लिंकचे काम पूर्ण करण्यास अडथळे येत आहेत.

> जिल्हाधिकारी प्रशासनाने भूसंपादनाचे काम पूर्ण करुन संबंधित जागा महापालिका प्रशासनाकडे हस्तांतरीत केली. तर आगामी काळात महापालिका प्रशासनाला संबंधित 42 रस्त्यांचे काम पूर्ण करता येणार आहे. त्यामुळे वाहतूक समस्या सोडवण्यासाठी मदत होईल, अशी अपेक्षा आहे. या अनुशंगाने, पिंपरी-चिंचवड शहरातील “मिसिंग लिंक” चे काम तातडीने पूर्ण करण्याबाबत कृती आराखडा तयार करावा, या करिता आम्ही पाठपुरावा करीत आहोत. शहरातील वाहतूक सक्षमीकरासाठी सर्वोतोपरी प्रयत्न करीत आहोत..
> - महेश लांडगे, आमदार, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

# अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिक त्रस्त

## पुणे वाढत्या उन्हाळ्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शहरातील विविध भागांत अपुऱ्या आणि कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

वाढत्या उन्हाळ्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शहरातील विविध भागांत अपुऱ्या आणि कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. एप्रिल महिन्यातच पाणी येत नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून केल्या जात असून, महानगरपालिकेचा पाणीपुरवठा विभाग मात्र याकडे गांभीर्याने पाहत नसल्याचा आरोप केला जात आहे. जलवाहिनीमधून होत असलेली पाणीगळती थांबविण्यासाठी दुरुस्तीची कामे महापालिकेकडून केली जात असल्याने अशा कामांवेळी संबंधित भागांतील पाणीपुरवठा बंद ठेवला जात असल्याने नागरिकांना पाण्यापासून वंचित राहावे लागत आहे.

कात्रज, भारती विद्यापीठ, कोंढवा यासह सहकारनगर, पर्वती या भागांत गेल्या काही दिवसांपासून पाणीपुरवठा विस्कळीत होण्याचे प्रमाण वाढले आहे. महापालिकेच्या वडगाव बुद्रुक जलशुद्धीकरण केंद्रातून सिंहगड रस्ता, कात्रज, कोंढवा या परिसराला पाणीपुरवठा केला जातो. गेले महिना ते दीड महिन्यापासून कात्रज गावठाण, सुखसागरनगर, कोंढवा, राजस सोसायटी या परिसरात आठवड्यातील एक दिवस पाणीपुरवठा बंद राहत आहे. गेल्या सहा आठवड्यांपासून दर मंगळवारी या भागातील पाणीपुरवठा बंद राहत असल्याने येथील नागरिक त्रस्त झाले आहेत. धरणात पुरेसे पाणी शिल्लक असताना महापालिकेकडून मात्र पाणीपुरवठा करण्यास अडचणी का येत आहेत, असा प्रश्न नागरिकांकडून विचारला जात आहे.

गेल्या आठवड्यात कात्रज परिसरातील आगम मंदिर येथे मुख्य जलवाहिनीतून होणारी पाणीगळती थांबविण्यासाठी पाणीपुरवठा विभागाने १७ एप्रिलला काम हाती घेतले होते. त्यामुळे भारती विद्यापीठ, सावंत विहार, वंडर सिटी, कदम प्लाझा, आंबेगाव बुद्रुक, जांभूळवाडी रोड, तसेच आजूबाजूच्या परिसरातील पाणीपुरवठा बंद ठेवण्यात आला होता.

आंबेगाव पठार येथील प्रभाग क्रमांक १६ मध्ये महापालिकेचे पाणी येत नसल्याने महिला वर्गामध्ये प्रचंड रोष आहे. या भागातील महिलांनी गेल्या आठवड्यात महापालिकेवर हंडा मोर्चा काढला. महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांना निवेदन देऊन या भागातील महिलांनी पाणीपुरवठ्याच्या तक्रारींचा पाढा वाचला. त्याची दखल घेऊन आयुक्त भोसले यांनी येथील पाणीपुरवठा सुरळीत करण्याच्या सूचना पाणीपुरवठा विभागाला दिल्या होत्या. मात्र, यामध्ये अद्यापही फारशी सुधारणा झाली नसल्याची तक्रार केली जात आहे. प्रभाग क्रमांक ३१ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात जीएसआर टाकीची मुख्य वाहिनी समान पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असताना गळती झाली. त्यामुळे मंगळवारी वारजे भागातील ब्रह्मचैतन्य सोसायटी, नवचैतन्य सोसायटी, आनंद कॉलनी, इंगळेनगर आदी भागांत पाणी आले नाही.



### धायरी परिसरातील पाणीपुरवठा गुरुवारी बंद

» सिंहगड रस्त्यावरील धायरी परिसरातील पाणीपुरवठा उद्या (गुरुवारी) २४ एप्रिलला बंद ठेवला जाणार आहे. जुनी धायरी येथे मुख्य दाब जलवाहिनीमधून पाण्याची गळती होत आहे. ही गळती थांबविणे, तसेच या परिसरात असलेल्या पारे कंपनी रस्ता येथे स्थापत्यविषयक तातडीचे देखभाल-दुरुस्तीचे काम करण्यासाठी पाणीपुरवठा बंद ठेवला जाणार आहे. गणेशनगर, लिमयेनगर, गारमळा, गोसावी वस्ती, बारांगणी मळा, दळवीवाडी, कांबळेवस्ती, मानस परिसर, नाईक आळी, यशवंत विहार आणि आजूबाजूच्या परिसरातील पाणी बंद राहणार आहे

> आंबेगाव पठार परिसरात गेल्या काही दिवसांपासून पुरेशा प्रमाणात पाणी येत नाही. त्यामुळे नागरिकांना टँकरने पाणी विकत घ्यावे लागते. महापालिकेचा कर भरत असतानाही पाण्यासाठी टँकरवर खर्च करावा लागत आहे. पाणीपुरवठ्यात सुधारणा न झाल्यास अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात येईल
>
> **- सुरेखा कदम पाटील, शिवसेना,**

> काही दिवसांपूर्वी पाणीपुरवठ्याच्या काही अडचणी होत्या. मात्र, या अडचणी सोडविण्यात आल्या आहेत. काही किरकोळ भाग वगळता कोठेही सध्या पाणी देण्यास अडचणी येत नाहीत. ज्या ठिकाणी तक्रारी असतील त्या विशिष्ट भागांची माहिती दिल्यास त्या सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल.
>
> **- नंदकिशोर जगताप, पाणीपुरवठा विभागप्रमुख, पुणे**

# अनामत रकमेवर निर्बंध, धर्मादाय रुग्णालयांबाबत राज्य सरकारची नवी नियमावली

## धर्मादाय रुग्णालयांबाबत अनामत रक्कम स्वीकारण्यावर निर्बंध घातले आहेत.

**पुणे | प्रतिनिधी**

धर्मादाय रुग्णालयांच्या विरोधात सातत्याने राज्य सरकारकडे तक्रारी येत होत्या. रुग्णांकडे अनामत रक्कम मागणे, पैशांअभावी उपचार नाकारणे, निर्धन रुग्ण निधीचा वापर न करणे अशा स्वरूपाच्या अनेक तक्रारी होत्या. या पार्श्वभूमीवर सरकारने धर्मादाय रुग्णालयांसाठी नवी नियमावली जाहीर केली असून, या रुग्णालयांना अनामत रक्कम स्वीकारण्यावर निर्बंध घातले आहेत. मंगेशकर रुग्णालयाने पैशांअभावी ईश्वरी (तनिषा) भिसे या गर्भवतीस उपचार नाकारल्याने तिचा मृत्यू झाल्याचा दावा करण्यात आला होता. याप्रकरणी राज्य सरकारने धर्मादाय सहआयुक्तांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमली होती. या समितीने चौकशी करून काही दिवसांपूर्वी राज्य सरकारला अहवाल सादर केला. या अहवालातील शिफारशींच्या आधारे राज्य सरकारच्या विधी व न्याय विभागाने धर्मादाय रुग्णालयांसाठी नवी नियमावली जाहीर केली आहे.

या नियमावलीत म्हटले आहे, की निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठीच्या योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी सर्व धर्मादाय रुग्णालयांना धर्मादाय आयुक्तांनी सूचना द्याव्यात. निर्धन रुग्ण निधी शिल्लक नसल्याच्या कारणामुळे उपचारांपासून वंचित राहू नये, यासाठी राज्यातील सर्व धर्मादाय रुग्णालयांनी सर्व सरकारी आरोग्य योजना लागू कराव्यात. त्यात महात्मा जोतिबा फुले जन आरोग्य योजना, आयुष्यमान भारत योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम यांसह आरोग्याशी संबंधित सर्व सरकारी योजनांचा समावेश आहे.




### धर्मादाय रुग्णालयांच्या नव्या नियमावलीत काय?

- » रुग्णांकडून अनामत रक्कम मागण्यावर निर्बंध
- » शासनाने निर्देशित केलेल्या कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे रुग्णाकडे मागण्यास मनाई
- » सर्व सरकारी योजना लागू करणे बंधनकारक
- » आपत्कालीन स्थितीत रुग्णावर उपचारास प्राधान्य
- » आरक्षित खाटांची मंत्रालयातील धर्मादाय रुग्णालय मदत कक्षात नोंद
- » निर्धन रुग्ण निधीची माहिती धर्मादाय आयुक्तांच्या संकेतस्थळावर

### रुग्णालयांचे उत्पन्नाचे इतर स्रोतही रडारवर

» अनेक धर्मादाय रुग्णालयांनी औषधविक्री, रोगनिदान चाचण्या बाह्यस्रोतांकडे हस्तांतरित केलेल्या आहेत. यामुळे रुग्णालयांचे एकूण महसुली उत्पन्न कमी होते आणि त्याचा परिणाम निर्धन रुग्ण निधीमध्ये जमा होणाऱ्या रकमेवर होतो. त्यामुळे अशा सुविधा रुग्णालयाने बाह्यस्रोतांकडे हस्तांतरित केलेल्या असल्या, तरी त्यांच्या एकूण वार्षिक महसुली उत्पन्नातील दोन टक्के रक्कम निर्धन रुग्ण निधीमध्ये वर्ग करावी, असेही नियमावलीत स्पष्ट करण्यात आले आहे.

# ऑटो क्लस्टर ते आयुक्त निवास मिसिंग लिंकचे काम प्रगतीपथावर!

## पिंपरी-चिंचवडमधील वाहतुकीच्या सुरळीततेसाठी आवश्यक सुधारणांचा समावेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुकीचा वाढता ताण लक्षात घेता, महापालिकेच्या स्थापत्य (प्रकल्प) विभागामार्फत काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावरील ऑटो क्लस्टर ते आयुक्त निवासस्थान दरम्यानच्या इंडोलिंक युरोसिटी औद्योगिक परिसरातील मिसिंग लिंक रस्ता विकसित करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सध्या प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात असून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एमआयडीसी) कडून आणखी काही जागांचा ताबा मिळाल्यानंतर काम पुर्णत्वाकडे येणार आहे. यामुळे काळेवाडी फाटा ते देहू आळंदी रस्त्यावरील वाहने कोणताही वळसा न घेता थेट जाण्याची सोय होणार आहे. पुणे महानगर परिवहनाच्या बसेसच्या मार्गात सुसुत्रता येणार आहे. महानगरपालिकेच्या प्राधान्यक्रमातील या कामामध्ये संबंधित मिसिंग लिंक रस्त्यांचे विस्तारीकरण, दुरुस्ती, जलवाहिनी व प्रकाशयोजना व्यवस्था तसेच वाहतुकीच्या सुरळीततेसाठी आवश्यक सुधारणा यांचा समावेश आहे.



प्रकल्पासाठी तांत्रिक व व्यवस्थापन सल्लागार म्हणून "मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि." या पुणे आधारित संस्थेची फक्त निविदा पश्चात काम करणेसाठी निवड करण्यात आली. यासाठी जानेवारी-फेब्रुवारी २०२५ दरम्यान प्रसिद्ध झालेल्या ई-कोटेशनद्वारे प्राप्त निविदाधारकापैकी "मॅप्स ग्लोबल सिव्हीलटेक प्रा. लि." यांचे दर सर्वात कमीचे प्राप्त झाले होते. त्यानुषंगाने त्यांना लेटर ऑफ इंटेंट देणेत आले होते व त्यानुसार फेब्रुवारी महिन्यापासून कंपनीने काम सुरू केले. या प्रकल्पामध्ये कोणतीही तडजोड न करता गुणवत्ता आणि वेळेचे नियोजन हे महत्त्वाचे निकष ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे कामास विलंब होऊ नये यासाठी कंपनीस त्वरित काम सुरू करण्याची परवानगी देण्यात आली होती. दरम्यानचे कालावधीमध्ये प्रशासकीय बाबींची पुर्तता करण्याची कार्यवाही चालू होती.

या कंपनीकडे कामाचे संपूर्ण नियोजन, देखरेख, गुणवत्ता तपासणी आणि तांत्रिक मार्गदर्शन याची जबाबदारी आहे. याशिवाय, रस्त्यांचे आराखडे, वाहतूक व्यवस्थापन, सुरक्षा उपाययोजना, पादचाऱ्यांची सुरक्षितता आणि पर्यावरणाचा समतोल राखून कामाची अंमलबजावणी करण्याबाबत देखील कंपनीला सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या कामाच्या प्रत्येक टप्प्यावर तपासणी करून अहवाल तयार केला जाणार असून काम दर्जेदार आणि वेळेत पूर्ण होईल याची दक्षता घेतली जात आहे. सद्यस्थितीमध्ये ३०मी. रुंदीचा रस्ता विकसित करण्यात आलेला असून तात्पुरत्या स्वरूपात वाहतूक सुरू केलेली आहे. एमआयडीसी कडून उर्वरीत जागा ताब्यात आल्यानंतर पूर्ण क्षमतेने रस्ता विकसित करण्यात येणार आहे.

> शहराचा शाश्वत आणि नियोजनबद्ध विकास हे पिंपरी चिंचवड महापालिकेचे उद्दिष्ट आहे. काळेवाडी फाटा ते देहू आळंदी या रस्त्यावरील इंडोलिंक युरोसिटी परिसरातील रस्त्याचे विकसनाचे काम हे त्याच दिशेने टाकलेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. नागरिकांना सुरक्षित, दर्जेदार आणि सुकर वाहतूक सुविधा देण्याच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा आहे. कामाची गुणवत्ता आणि वेळेचे नियोजन याबाबत कोणतीही तडजोड न करता प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात आली आहे. या उपक्रमामुळे शहरातील वाहतूक अधिक सुसंगत होईल आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल घडून येतील असा विश्वास आहे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

> ऑटो क्लस्टर ते आयुक्त निवास रस्ता जवळील इंडोलिंक युरोसिटी औद्योगिक परिसरातील मिसिंग लिंक रस्त्याचे काम हे शहराच्या वाहतूकदृष्ट्या अतिशय महत्त्वाचे आहे. या प्रकल्पात रस्त्यांचे विस्तारीकरण, पाणीपुरवठा व्यवस्था, प्रकाशयोजना आणि वाहतूक सुरळीत करणाऱ्या विविध सुधारणा समाविष्ट आहेत. निविदा पश्चात कामासाठी सल्लागार संस्थेच्या मदतीने कामाचे काटेकोर नियोजन आखण्यात आले असून काम प्रगतीपथावर आहे. तसेच जागा हस्तांतरण प्रक्रिया जलद गतीने पुर्ण करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या समवेत आयुक्त पातळीवर मार्च अखेर झाली आहे. उर्वरीत जागा रिकामी करण्यासाठी एमआयडीसी मार्फत मागील आठवड्यात कळविले आहे.कामाची मुदत जानेवारी २०२६ पर्यंत आहे. उर्वरीत रस्त्याचे काम मुदतीपूर्वी पूर्ण करून वाहतुकीसाठी पूर्ण क्षमतेने खुला करणेचे नियोजन आहे.
>
> **-प्रमोद ओंभासे, मुख्य अभियंता, स्थापत्य (प्रकल्प) विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका**

# डाव-प्रतिडाव टाकत प्रशिक्षण केंद्रात घडताहेत मल्ल

## प्रशिक्षण केंद्रातून 9 ते 10 वयोगटापासून ते 25 वयोगटापर्यंतचे मल्ल कुस्तीचे डाव-प्रतिडाव शिकत आहेत

**पिंपरी | प्रतिनिधी**

भोसरी आणि प्राधिकरण येथे सुरू असलेल्या प्रशिक्षण केंद्रातून 9 ते 10 वयोगटापासून ते 25 वयोगटापर्यंतचे मल्ल कुस्तीचे डाव-प्रतिडाव शिकत आहेत. दररोज चार तास सराव करून त्यांचे कौशल्य विकसित होत आहे. येथून घडलेल्या काही विद्यार्थ्यांनी जिल्हा आणि राज्य पातळीवर चमकदार कामगिरी केली आहे.



पिंपरी-चिंचवड शहरामध्ये गाव पातळीवर सुमारे 25 ते 30 आखाडे आहेत. येथे विद्यार्थी दररोज व्यायाम करतात. मात्र, व्यावसायिक कुस्ती स्पर्धांसाठी प्रशिक्षण घेण्याची सोय महापालिकेचे भोसरी येथील कै. मारुतराव लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र आणि प्राधिकरण येथील संजय काळे मैदान येथेच उपलब्ध आहे. लांडगे कुस्ती प्रशिक्षण केंद्रात सध्या 120 मुले प्रशिक्षण घेत आहेत. 9 ते 10 वयोगटापासून येथे 25 वयोगटापर्यंतच्या मुलांना प्रशिक्षण दिले जात आहे. येथे मॅटवरच्या कुस्तीची सोय आहे.

महापालिकेच्या प्राधिकरण येथील संजय काळे मैदान येथे दीड महिन्यापूर्वी पिंपरी-चिंचवड राष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले. सध्या येथे 22 मुले कुस्तीचे प्रशिक्षण घेत आहेत. 9 ते 10 वयोगटापासून थेट 22 वयोगटापर्यंतच्या मुलांचा त्यामध्ये समावेश आहे. मुलांकडून येथे सकाळी आणि सायंकाळी प्रत्येकी दोन ते अडीच तास कुस्तीचा सराव करून घेतला जात आहे. येथुनही कुस्तीचे प्रशिक्षण घेऊन मल्ल तयार होत आहेत.

### अशी नोंदवा तक्रार

» कै. मारुतराव लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेणार्या मुलांनी जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धांमध्ये यश खेचून आणले आहे. 15 वर्षाखालील वयोगटामध्ये झालेल्या राज्यस्तरीय अजिंक्यपद स्पर्धेत आर्यन मुळे (45 किलो वजनगट), प्रणव लांडगे (51 किलो वजनगट) यांनी तृतीय क्रमांक पटकावला. सागर राऊत याने युवा महाराष्ट्र केसरी स्पर्धेत (20 वर्ष वयोगटाखालील) 70 किलो वजनगटात तृतीय क्रमांक तर, महाराष्ट्र केसरी (कर्जत) स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. त्याशिवाय, शालेय राज्यस्तरीय 17 वर्षाखालील वयोगटात (52 किलो वजनगट) प्रणव लांडगे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धांमध्ये विविध वजनगटांमध्ये 11 मुलांनी यश खेचून आणले. पैलवान जागृती गावडे यांनी 17 वर्षाखालील वयोगटातील (62 किलो वजनगट) शालेय राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला आहे. राष्ट्रीय खेळाडू व प्रशिक्षक अजय लांडगे, किशोर नखाते येथे प्रशिक्षक म्हणून काम पाहत आहेत.

> महापालिकेच्या कै. मारुतराव लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण घेणाऱ्या मुलांनी जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धांमध्ये चांगले यश मिळविले आहे. येथे 9 ते 10 वयोगटापासून 25 वयोगटापर्यंतच्या मुलांना प्रशिक्षण दिले जात आहे. कुस्ती शिकणार्या विद्यार्थ्यांना पुरेसा पोषक आहार मिळावा, यासाठी महापालिकेकडे मागणी केलेली आहे.
>
> **- अजय लांडगे, प्रशिक्षक, कै. मारुतराव लांडगे आंतरराष्ट्रीय कुस्ती प्रशिक्षण केंद्र.**

# लाखो वीजग्राहकांना पेटत्या कचऱ्याचा फटका

## प्रामुख्याने महापारेषणच्या टॉवर लाइन्सखाली गेल्या 23 फेब्रुवारी ते 28 मार्चपर्यंत गवत, ऊस व जंगलातील वणवासदृश आगीचे पाच प्रकार घडले.

**पुणे | प्रतिनिधी**

वीजयंत्रणेजवळ किंवा वीजतारांखाली ऊस, गवत व कचरा पेटवण्याच्या प्रकारांमुळे गेल्या महिनाभरात पारेषण व वितरण यंत्रणेत ८ ठिकाणी बिघाड झाला, तर तब्बल ७ लाख ६५ हजार वीजग्राहकांना खंडित वीजपुरवठ्याचा नाहक त्रास सहन करावा लागला. महावितरणला अशा प्रकारच्या आगींमुळे मोठा आर्थिक फटका बसत आहे.

शहरी व ग्रामीण भागात अनेक ठिकाणी महापारेषण व महावितरणच्या वीजवाहिन्या शेतातून, जंगलातून गेलेल्या आहेत. प्रामुख्याने महापारेषणच्या टॉवर लाइन्सखाली (वीजतारांच्या वाहिन्या) गेल्या २३ फेब्रुवारी ते २८ मार्चपर्यंत गवत, ऊस व जंगलातील वणवासदृश आगीचे पाच प्रकार घडले. त्यामुळे प्रामुख्याने चाकण, भोसरी व हिंजवडी फेज १ ते ३ मधील सर्व लहान-मोठे उद्योग तसेच पिंपरी-चिंचवड शहर, वाकड, भोसरी गाव आदींसह मुळशी तालुक्यातील अनेक गावांतील सुमारे ५ लाख ९६ घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांना दोन ते तीन वेळा प्रत्येकी ४५ ते ६० मिनिटे खंडित वीजपुरवठ्याला सामोरे जावे लागले. आंबेगाव बुद्रुक येथील ओढ्याजवळ टाकलेल्या कचऱ्यांच्या ढिगाऱ्याला आग लागल्याने महावितरणच्या ‘अमित उपकेंद्रा’ला वीजपुरवठा करणारी वीजवाहिनी जळाली. परिणामी, २७ हजार वीजग्राहकांना त्रास सहन करावा लागला, अशी माहिती महावितरणकडून देण्यात आली.

‘अनेक ठिकाणी वीजयंत्रणेच्या आसपास कचरा व शिळे खाद्यपदार्थ टाकण्यात येत असल्याचे आढळते. खाद्यपदार्थांमुळे मांजर, उंदीर, घूस, पक्षी आदींसह सरपटणारे प्राणी तेथे येतात आणि वीजयंत्रणेच्या संपर्कात आल्यावर शॉर्ट सर्किट होऊन वीजपुरवठा खंडित होतो. त्यामुळे वीजयंत्रणेजवळ कचरा टाकू नये, जाळू नये. असे प्रकार घडताना दिसल्यास ‘महावितरण’च्या यंत्रणेला लवकरात लवकर कळवावे,’ असे आवाहन ‘महावितरण’चे पुणे विभागाचे मुख्य अभियंता राजेंद्र पवार यांनी केले.



### वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार

» महावितरणच्या माहितीनुसार, आळंदी-कळस रस्त्यावर ग्रेफ सेंटरसमोर असलेल्या ओढ्यात चरांमध्ये फेकलेल्या कचऱ्याला आग लागली. या आगीत महावितरणच्या ८ वीजवाहिन्या जळून खाक झाल्या. मंगळवारी, १५ एप्रिलला पहाटे अडीचच्या सुमारास हा प्रकार घडला. त्यामुळे विश्रांतवाडी, कळस, धानोरी, लोहगाव परिसरातील सुमारे १ लाख १५ हजार ग्राहकांचा वीजपुरवठा पहाटे पाच वाजेपर्यंत विस्कळीत झाला. विश्रांतवाडी, कळस परिसरातील सुमारे १० हजार आणि दिघी परिसरातील १७ हजार, अशा २७ हजार वीजग्राहकांचा वीजपुरवठा दुपारी साडेबारा वाजेपर्यंत बंद होता. मंगळवारी, १५ एप्रिलला वाघोली, केसनंद परिसरात रोहित्रांजवळ कचरा साठवून तो जाळण्याचे प्रकार समोर आले. त्यामुळे केबल जळाल्याने स्थानिक परिसरात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रकार घडले.

### अशी नोंदवा तक्रार

» नागरिकांनी सार्वजनिक ठिकाणी असलेल्या वीजवाहिन्यांच्या खाली तसेच रोहित्र, फिडर पिलर व इतर वीजयंत्रणेजवळ ओला व सुका कचरा टाकू नये. साठवलेला कचरा जाळू नये. कचरा, वाढलेले तण, गवत, उसाच्या आगीमुळे प्रामुख्याने वीजवाहिन्यांमध्ये ट्रिपिंग आल्याने वीजपुरवठा खंडित होतो. वीजयंत्रणेला जवळच्या आगीमुळे धोका असल्याचे लक्षात येताच २४ तास सुरू असलेल्या महावितरणच्या १९१२ / १८००२१२३४३५ किंवा १८००२३३३४३५ या टोल फ्री क्रमांकावर माहिती द्यावी, असे आवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे.

> आग लागून वीज यंत्रणेचे आणि पर्यायाने ग्राहकांचे नुकसान होऊ नये म्हणून दक्षता घेण्यात येते. सार्वजनिक ठिकाणी असलेल्या रोहित्रांना संरक्षक जाळ्या, सीमाभिंती बांधण्यात आल्या आहेत.
>
> - राजेंद्र पवार, मुख्य अभियंता, पुणे विभाग, महावितरण

# शेतीला उन्हाळी आवर्तन 1 मेपासून सुरू; धरणसाखळीत 34.77 टक्के पाणीसाठा

## दौंड, हवेली, इंदापूरसह जिल्ह्यातील 66 हजार हेक्टर शेतीला उन्हाळी आवर्तनाचे दुसरे पाणी सोडण्यास सुरुवात होणार आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

खडकवासला धरणातून 1 मेपासून दौंड, हवेली, इंदापूरसह जिल्ह्यातील 66 हजार हेक्टर शेतीला उन्हाळी आवर्तनाचे दुसरे पाणी सोडण्यास सुरुवात होणार आहे. त्यासाठी खडकवासला जलसंपदा विभागाने यंत्रणा सज्ज केली आहे.

चार धरणांच्या धरणसाखळीत सोमवारी (दि. 21) सायंकाळी पाच वाजता 10.13 टीएमसी म्हणजे 34.77 टक्के पाणीसाठा शिल्लक होता. धरणसाखळीची एकूण पाणी साठवणक्षमता 29.15 टीएमसी आहे. पुणे शहर आणि परिसरातील एक कोटी नागरिकांना पिण्यासाठी पुरेशा प्रमाणात पाणी सोडले जात असल्याने तसेच कडकडीत उन्हामुळे धरणसाखळीतील चारही धरणांतील पाण्याचे बाष्पीभवन वाढले आहे. त्यामुळे दर तासागणिक धरणसाठ्यात घट सुरू आहे.

खडकवासला जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता श्वेता कुर्‍हाडे म्हणाल्या, ’नियोजनाप्रमाणे दौंड, हवेली, इंदापूरसह जिल्ह्यातील शेतीला 1 मेपासून दुसरे उन्हाळी आवर्तन सोडण्यात येणार आहे. दुसर्‍या आवर्तनात तीन टीएमसी पाणी दिले जाणार आहे. त्यामुळे पिकांना तसेच तेथील रहिवाशांना लाभ मिळणार आहे.

उन्हाळी आवर्तनाचे पहिल्या टप्प्यातील पाणी येत्या 25 एप्रिल रोजी बंद करण्यात आले. मात्र, खडकवासला धरणापासून 202 किलोमीटर अंतरावरील इंदापूरच्या शेवटच्या टोकाला पुरेसे पाणी मिळाले नाही. त्यामुळे तेथील शेतकर्‍यांत तीव्र संतापाची लाट उसळली आहे. त्यामुळे दुसर्‍या आवर्तनाचे पाणी सर्व लाभक्षेत्रांत मिळावे, यासाठी जलसंपदा विभागाने आता नियोजन केले आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवशी 21 एप्रिल 2024 रोजी धरणसाखळीत 9.50 टीएमसी म्हणजे 32.59 टक्के साठा होता. पुण्याच्या उपनगरातील लोकसंख्या वाढल्याने तसेच नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावांत पाण्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी देण्यासाठी जलसंपदा विभागाला मोठी कसरत करावी लागत आहे. धरणातून 1 मेपासून दौंड, हवेली, इंदापूरसह जिल्ह्यातील 66 हजार हेक्टर शेतीला उन्हाळी आवर्तनाचे दुसरे पाणी सोडण्यास सुरुवात होणार आहे. त्यासाठी खडकवासला जलसंपदा विभागाने यंत्रणा सज्ज केली आहे.



### अशी नोंदवा तक्रार

» गतवर्षीच्या तुलनेत धरणसाखळीत जेमतेम पाऊण टीएमसीपेक्षा अधिक पाणी आहे. गेल्या वर्षी आजच्या दिवशी 21 एप्रिल 2024 रोजी धरणसाखळीत 9.50 टीएमसी म्हणजे 32.59 टक्के साठा होता. पुण्याच्या उपनगरातील लोकसंख्या वाढल्याने तसेच नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावांत पाण्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे पुरेशा प्रमाणात पाणी देण्यासाठी जलसंपदा विभागाला मोठी कसरत करावी लागत आहे.